ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 2 | OCTOBER - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीनिर्मुलन विषयक विचार

प्रा. शिंदे विकास विलासराव
इतिहास विभाग , माऊली महाविद्यालय, वडाळा ,
ता.उ. सोलापूर जि. सोलापूर.

## * प्रस्तावना



हजारो वर्षाची जातीप्रथा भारतीय समाजव्यवस्थेचे अविभाज्य अंग बनून राहिला आहे. तिचा प्रारंभ आर्य निर्मित वर्ण व्यवस्थेच्या आधाराने झाला. तरीही वर्ण व्यवस्था व जातीप्रथा ह्या बाबी भिन्न होत्या. मुलत: वर्णव्यवस्थेचा संबंध रंगाशी व पराभूत अनार्याशी होता. आणि जाती निर्मितीसाठी वर्णसंकर, परकीय आक्रमणे व विविध व्यवसाय कारणीभूत ठरले. वर्ण व जाती एकच माणनाऱ्यापैकी आणि भारतीय जातीप्रथा व वर्ण केवळ ब्राम्हणनिर्मित गृहीत धरल्यामुळे अपरिपक्व संशोधकात वैचारिक गोंधळ निर्माण झाला. परिणामी मोठमोठया समाज सुधारकांनी गेल्या तीन हजार वर्षाची भारतीय जातीव्यवस्था केवळ मतलबी स्वार्थी ब्राम्हण आर्यानीच निर्माण केली. असा ग्रह करुन घेतला पण वस्तुस्थिती मात्र वेगळीच आहे.

## * जातीसंस्थेचा उदय

जातीप्रथेचा उदय केंव्हा झाला हे ठामपणे सांगता येणार नाही. आर्यांच्या वैदिक संस्कृतीत चार वर्ण होते. आणि पुढील काळात हजारो जाती निर्माण झाल्या. जातीची संख्या भरमसाठ वाढली. मनुने समाजात चार वर्ण व पन्नास जाती असल्याचे नमूद केले आहे. तर डॉ. केतरांनी देखील चार वर्ण आणि तीन हजार जातीचा उल्लेख केला. अनेक इतिहास संशोधकाने वर्ण आणि जाती भिन्न असल्याचा निर्वाळा दिलेला आहे. 'विशिष्ठ समुहात्मक परिवाराच्या चालीरिती व धार्मिक संस्कारामधून जातीप्रथेचा उदय झाला.' डॉ. स्मितच जाती विषयक दृष्टीकोन व्यवहार्य आहे वाटतो. रॅप्सन या विद्वानांनी गौरवर्णीय आर्य व कृष्णवर्णीय अनार्याच्या रंगभेदामधून जाती निर्माण झाल्या तर रंग व जन्मावरुन जाती निर्माण झाल्याचे मत डॉ. गोखले यांनी मांडले आहे. तसेच डॉ. नेसफिल्ड यांनी शिका, पशुपालन, व्यापार, धर्मविधी व विविध व्यवसायामुळे जाती निर्माण झाल्या तसेच परकीय गुलामगिरी प्रथेचे अनुकरण, आंतरवर्गीय व आंतरदेशीय विवाह, विविध धर्मग्रंथाचे अनुकरण व ईश्वरनिर्मित व्यवस्था या कारणामुळे जाती उदयाला आल्या. या सर्व मतांतरावरुन केवळ आर्यनिर्मित वर्णव्यवस्थाच भारतीय जातीप्रथेसाठी कारणीभूत नसून त्यासाठी इतर घटक ही जबाबदार आहेत. वर्णव्यस्थेच्या विकृती मधून जातीप्रथा उदयास आली.

## *जाती व्यवस्थेचा विकास

जाती व्यवस्थेचा विकास अनेक कारणातून झालेला आहे. त्यामध्ये वेदकालिन चार वर्णाचे रुपांतर चार जातीत झाले. तसेच वेदकालीन दस्यू कालांतराने शूद्र जातीत रुपांतर झाले. विविध उद्योग व्यवसाय यामुळे जाती निर्माण झाल्या. तसेच अनेक धर्मपंथ व अनुयायी यातून जातीचा विकास झाला. तसेच परकीय आक्रमणे व स्थायीत्व यातून भारतात उपजाती निर्माण झाल्या. तसेच विविध कलाकार धर्मग्रंथ व उत्तर वैदिक काळात जातीसंस्थेचा विकास घडून आला.

*** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जाती व विकासाविषयी मत**

डॉ. आंबेडकरांनी जातीचा उगम व विकास या विषयावर मुलभूत स्वरुपाचे चिंतन केलेले आहे. त्यांच्या पहिल्याच महत्वाच्या शोधनिबंधात जातीविषयी माहिती दिलेली आहे. (Caste in India) या शोध निंबधाचे मुख्य सुत्र वर्गव्यवस्थेतून जाती कशा निर्माण झाल्या हे स्पष्ट करणाऱ्या आहेत. डॉ. आंबेडकरांच्या मताप्रमाणेच संपूर्ण जगाचा इतिहास हा जर वर्गीय समाजाचा इतिहास असेल तर भारत त्याला अपवाद कसा ठरेल? त्यामुळे संपूर्ण जगात जसे तसेच भारतात सुध्दा एकेकाळी वर्गच होते. पण समाजात दोन वर्ग नसून अनेक वर्गाने समाज बनलेला असतो. समाजातील प्रत्येक व्यक्ती कोणकोणत्या वर्गाची सदस्य असते म्हणजे जातीची सदस्य असते. डॉ. आंबेडकर म्हणतात भारतीय समाजाचा इतिहास जर जगातील इतर देशाप्रमाणे वर्गीय समाजाचा असेल तर जगात अन्यत्र कोठेही जाती निर्माण झाल्या नाहीत? केवळ भारतातच जाती कोठून आल्या? त्यांचा जन्म कसा झाला? त्या निर्माण करण्यासाठी व विकास करण्यासाठी कोणती साधने वापरली हा प्रश्न डॉ. आंबेडकरांसमोर उभा राहतो.

डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'ज्या संशोधकाने जातीसंस्थेचा अभ्यास केला पण त्यांनी जातीसंस्था अनुभवली नव्हती म्हणून तो अभ्यास वरवरचाच होता.' डॉ. आंबेडकरच्या दृष्टीने जात स्वत:च एक सुटा, स्वतंत्र असा घटक नाही तर जात ही संपूर्ण समाजाची निश्चित स्वरुपाचे संबंध असणारी व या समाजाच्या अंतर्गत एका गटाच्या स्वरुपात अस्तित्वात राहणारी गोष्ट आहे. त्यात एकही सुटा किंवा स्वतंत्र जात अशी कधीही अस्तित्वात असू शकत नाही. ती जाती समाजातच अस्तित्वात येते. त्यामुळे आपल्याला डॉ. आंबेडकरांच्या जातीच्या उगमाची व विकासाची संकल्पना समजून घेताना दोन गोष्टी समजून घ्याव्या लागतील. पैकी एका जातीचे संपूर्ण समाजाशी निश्चित स्वरुपाचे संबंध कसे असतात. आणि दूसरी समाजाच्या अंतर्गत एका गटाच्या रुपात जातीचे अस्तित्व कसे असते.

डॉ. आंबेडकरांनी जातीचा उगम वर्गाच्या पोटात शोधला. वर्गाचा उगम शोधताना ते म्हणतात, जगात धर्मसंस्था व विवाहसंस्थेमध्ये वर्ग खुला होता. व भारतात वैदिक काळात वर्ग खुला होता. म्हणजेच विवाहसंस्था मुक्त व वर्गबाह्य विवाह करणे निषित मानीत नव्हते. परंतू उत्तर वैदिक काळात भारतात वर्ग खुले राहिले नाहीत तर ते बंदिस्त झाले. विवाहसंस्थेने वर्ग बंदिस्त करण्याचे काम केले. वर्ग बाह्य विवाहांना धर्माने व समाजाने निषेद ठरविले आंतरवर्गीय विवाह प्रथा संपुष्टात आली ज्या क्षणी या गोष्टी घडल्या त्याक्षणी भारतामध्ये जातीसंस्थेचा उगम झाला असे डॉ. आंबेडकरांचे मत आहे. आंतवर्गीय विवाहांच्या जागी वर्गातंर्ग विवाह पवित्र आणि समाज मान्य मानने म्हणजेच जातीसंस्थेला जन्म देणे होय. म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात, जातीसंस्था ही माणसाने निर्माण केलेली कृत्रिम संस्था आहे. ती ईश्वर निर्मित किंवा नैसर्गिक नसून ती माणसाने किंवा ब्राम्हणाने स्वार्थासाठी विकसित केलेली संस्था आहे.

डॉ. आंबेडकरांनी जातीची व्याख्या म्हणजे 'बंदिस्त वर्ग म्हणजे जात होय ' अशी केलेली आहे. त्यामुळे आपल्याला वर्गबंदिस्त कसे केले जातात. हे समजून घेतले पाहिजे त्याशिवाय जाती कशा निर्माण होतात हे समजणार नाही. डॉ. आंबेडकरांच्या मते, वर्ग बंदिस्त करण्यासाठी भारतीयांनी विवाह संस्थेचा उपयोग केला. कारण त्यांना जातीची निर्मिती करायची होती. वर्ग बंदिस्त करण्यासाठी म्हणजेच जातीच्या निर्मितीसाठी आपल्या धर्मातील पूर्वजानी स्त्रीचा एक हत्यार म्हणून उपयोगी केला. या सर्व गोष्टीसाठी वाढीव स्त्री ही संकल्पना निर्माण करुन रुढी परंपरा निर्माण करुन समाज बंदिस्त करण्याचे काम धर्म ग्रंथांनी केले असे डॉ. आंबेडकर म्हणतात.

जातीसंस्थेबद्दल डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, जातीसंस्थेने केवळ अस्पृश्यांना छळले, त्यांना दु:ख आणि द्रारिद्रय दिले असे नाही तर जाती संस्थेला निर्मितीने संपूर्ण राष्ट्रालाच उध्वस्त करुन टाकले. भारत राजकीयदृष्टया एक होण्याची शक्यताच नष्ठ करुन टाकली, ह्या जातीसंस्थेवर उभ्या असणाऱ्या संस्कृतीला खरी संस्कृती म्हणता येईल का? म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात ही संस्कृती नसून जाती संस्था ही विकृती आहे.

डॉ. आंबेडकर म्हणतात, भारतात कोणत्या वर्गाने स्वत:ला बंदिस्त केले आणि स्वत:ला जातीत रुपातरीत करुन घेतले त्याचे उत्तर डॉ. आंबेडकर देताना म्हणतात की, पुरोहित किंवा ब्राम्हणाने स्वत:ला बंदिस्त करुन जातीनिर्मितीचा प्रसार सुरु झला. डॉ. आंबेडकरांच्या अगोदर अनेक विचारवंतानी जातीची निर्मिती दैवी शक्तीतून किंवा मनुने केलेली आहे असे म्हणतात. पण हे चुकिचे आहे. कारण मनुच्या जन्मापूर्वी जाती व्यवस्था भारतात होती. मनुने सगळयात मोठे काम कोणते केले असेल तर हे की, तो स्वत: जातीव्यवस्थेचा प्रसारक बनला त्याने निर्माण केलेली मनुस्मृती म्हणजे व्यवहारातील जातीव्यवस्थेचा तात्विक आधार देणारा ग्रंथ होय असे डॉ. आंबेडकर म्हणतात.

जातीचा प्रसार कशाप्रकारे झाला या विषयी डॉ. आंबेडकर असे सांगतात की, समाज हा अनुकरणप्रिय असतो. भारतातील ब्राम्हणेत्तर वर्ग ही अनुकरणप्रिय होता व त्याने ब्राम्हणवर्गाचे अनुकरण केल्याने जातीसंस्था समाजात तळापर्यत जावून पोहचली. डॉ. आंबेडकर या प्रक्रियेला अनुकरणाचा संसर्ग असे म्हणतात. ज्या वर्गाचे अनुकरण करावे असा वर्ग समाजात मानाच्या स्थानी असला पाहिजे या दोही ही विचार केल्यास ब्राम्हण वर्गाने 'भूदेव' म्हणून समाजात महत्वपूर्ण

स्थान मिळवले होते. हे स्थान बहुजन समाजाचा विषय आहे. डॉ. आंबेडकरांनी जातीसंस्थेबद्दल चार निष्कर्ष काढले आहेत. १) हिंदू समाजाची रचना समिश्र असली तरी तेथे सांस्कृतिक ऐक्य खोलवर रुजलेले आहे. २) जात म्हणजे एका मोठया सांस्कृतिक ऐक्य असलेल्या समाजाचा एक अंशात्मक तुकडा आहे. ३) मोठया जातीची सुरुवात करणारी पहिली मुख्य जात आहे. ४) अनुकरणाच्या व बहिष्काराच्या माध्यमाद्वारे वर्गाचे रुपांतर जातीत झाले.

डॉ. आंबेडकरांनी जाती व्यवस्था व अस्पृश्यता नष्ठ करण्यासाठी स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये व समाज व्यवस्थे विरुधी अनेक आंदोलने केली त्यामध्ये महाडचा सत्याग्रह, मनुस्मृती दहन, अम्मादेवी मंदिर, पुणेपर्वती मंदिर, नाशिक काळाराम मंदिर असे सत्याग्रह करुन जातीव्यवस्था नष्ठ करण्याचा प्रयोग केला.

### * डॉ. आंबेडकरांनी जाती व्यवस्था नष्ठ करण्याचे मार्गदर्शक तत्वे

१) जातीसंस्था नष्ठ करण्यासाठी ज्या विवाहसंस्थेद्वारे जातीसंस्था अस्तित्वात आली त्यात विवाह संस्थेचा उपयोग जाती नष्ट करण्यासाठी केला पाहिजे कारण जातीची निर्मितीच वर्गाअंतर्गत विवाहाची सक्ती करुन आणि वर्ग बंदिस्त करुन झ ाालेली आहे. प्रत्येक जात ही एक बंदिस्त किल्ला बनलेला आहे. त्या बंदिस्त किल्ल्यातून स्त्री - पुरुषांना मुक्त केले पाहिजे. प्रत्येक जातीने स्त्री-पुरुषांचा संबंध इतर जातीच्या स्त्री-पुरुषाशी येणे आवश्यक आहे त्यासाठी आंतरजातीय विवाह ही सर्वात महत्वाची गोष्ट डॉ. आंबेडकर मानीत होते. डॉ. आंबेडकरांचे म्हणणे एवढेच होते की, आपल्या तरुण मुलींवर आपल्याच जातीतील मुला-मुलींबरोबर विवाह करण्याची सक्ती करु नका व जीवन साथी निवडण्यासाठी स्वातंत्र्य दया. आणि प्रेम विवाहाला मान्यता दिली तर या समाजातील जातीव्यवस्था संपूष्टात मदत होईल असे डॉ. आंबेडकर म्हणतात.

२) जाती नष्ठ करण्याचा दुसरा उपाय डॉ. आंबेडकरांनी सुचविला होता. तो धर्मासंबंधी होता. जो धर्म जातीचे संस्कार शिकवीतो त्या धर्माचा त्याग केला पाहिजे आणि जातीच्या जोकडातून बाहेर पडले पाहिजे. त्यामुळे हिंदू धर्मातील असंख्य जाती नष्ट होतील. धर्मातर हा जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी महत्वाचा उपाय आहे.

३) जाती नष्ट करण्यासाठी डॉ. आंबेडकर म्हणतात. राष्ट्रीय संपत्तीचे फेरवाटप करणे आणि राष्ट्र समाजवादाचा पुरस्कार करणे. या देशात दोन प्रकारची विषमता आहे एक सामाजिक विषमता व दूसरी आर्थिक विषमता. या दोन्हींही विषमता परस्परालंबी आहेत. त्यासाठी देशातील आर्थिक प्रश्न व समस्या जमिन वाटप, गरीब श्रीमंत भेद नष्ट केल्यास आर्थिक समानता निर्माण होईल. त्यामुळे देशातील दरी कमी होऊन जातीयता नष्ट होऊ शकेल.

४) जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी कायद्याने स्त्री-पुरुष यांना समान अधिकार व हक्क दिले पाहिजेत. त्यामुळे जातीयता नष्ट होईल.

५) जातीयता नष्ट करण्यासाठी समाजात सामाजिक सहिष्णुता निर्माण करुन जातीयता नष्ट करता येईल.

थोडक्यात डॉ. आंबेडकरांनी भारतीय समाजातील प्राचीन काळापासून अस्तित्वात आलेली जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी समाजातील जनतेची मानसिकता बदलण्याची गरज सांगीतली आहे. जोपर्यंत या देशातील प्राचीन धर्मग्रंथ स्मृतीग्रंथ रुढीपरंपरा कायद्याने नष्ट होणार नाहीत. तोपर्यंत जातीव्यवस्था नष्ट होणार नाही. जातीव्यवस्था देशाच्या प्रगतीतील मुख्य अडचण असून ती दूर करण्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा अवलंबन समाजाने केला पाहिजे. तरच जाती निर्मुलन होऊ शकेल.

### संदर्भ ग्रंथ सूची

१) Who were the Shudras? - Dr. B.R. Ambedkar
२) Annihilation of Cast - Dr. B.R. Ambedkar
३) Caste in India - Dr. B.R. Ambedkar
४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - धनंजय कीर
५) आंबेडकर - नलिनी पंडित
६) जातवर्ग व परिवर्तनाचा लढा - प्रा. विलास रणसुभे
७) प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास - प्रा. पी.जी.जोशी
८) समग्र आंबेडकर चरित्र - प्रा. बी.पी. कांबळे